पशुधन विकास अधिकारी,
महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट-अ,
या पदावर (सरळसेवा भरती)
नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्र. पसंप्र-२०१६/प्र.क्र.२५०/भाग-२/पदुम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- २९ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा :</u>-१. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही-२०१५/प्र.क.१५६/कार्या.१२, दि.२८.४.२०१५.
२. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही-२०१५/प्र.क.१५६/कार्या.१२, दि.१६.७.२०१५.
३. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही-२०१७/प्र.क.११४/कार्या.१२, दि.१५.०६.२०१७.
४. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई यांचे आदेश दि.०७.०३.२०१९
५. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. १९४ (१)(२)(४७) /२६१९/ पंधरा-अ, दि.१० मे,२०१९

शासन आदेश:-

डॉ. गणेश पालवे व इतर यांनी मा. मॅट मुंबई येथे दाखल केलेला मुळ अर्ज क्र.१०६२/२०१७ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दि.०७.०३.२०१९ रोजी निर्णय देवून तक्रारदार यांच्या विनंती नुसार खुल्या प्रवर्गातील २५ उमेदवांराची पशुधन विकास अधिकारी या पदावर नियुक्तीच्या अनुषंगाने दोन महिन्यामध्ये निर्णय घेण्याबाबत आदेश पारित केले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या दि.१० मे, २०१९ च्या पत्रान्वये अमागास प्रवर्गाच्या २५ रिक्त ठेवलेल्या पदांवर शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येऊन सुधारीत निकाल दि. ४ मे, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार ९४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून २५ उमेदवार नव्याने शिफारस पात्र ठरविले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत त्यांचे दि.१०.०५.२०१९ च्या पत्रान्वये पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा (जाहीरात क्र.२४/२०१७) नुसार २५ उमेदवारांची निवड करुन त्यांची नियुक्ती करीता शासनाकडे शिफारस केली आहे. आयोगामार्फत शिफारस केलेल्या एकूण २५ उमेदवारांपैकी २२ उमेदवारांचा वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे. पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी, गट-अ या संवर्गात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याने सदर रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने अशा २२ उमेदवारांची पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा (गट-अ) (एस-२०: ५६१००-१७७५००/-) या पदावर सदर उमेदवारांचे पोलिस तपासणी अहवाल प्राप्त होण्याच्या अधीन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम,१९८१ मधील नियम (४३) मध्ये विहित केलेल्या परिविक्षाधीन या संज्ञेच्या व्याख्येनुसार खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत येत आहे. सदर नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवाराचा

परिविक्षाधीन कालावधी २ वर्षाचा राहील. सदर उमेदवाराची पहिली वेतनवाढ त्यांचा १ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर व त्यानंतरची वेतनवाढ त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल.

अ. क्र.	**गु. क्र.**	**उमेदवारांची नांवे**	**शासन अधिसूचना दि.२८.०४.२०१५,१६.०७.२०१५ व १५.०६.२०१७ मधील तरतुदीनुसार वाटप केलेला विभाग**	**पदस्थापनेचे पद**
१.	**२.**	**३.**	**४.**	**५.**
१.	२	डॉ. आडे विशाल रमेश	नागपूर	पविअ, पवैद श्रे.१ अदासी ता. जि. गोंदिया
२.	८	डॉ. देशपांडे वैभव प्रकाशराव	नागपूर	पविअ (विस्तार), पंचायत समिती आरमोरी, जि. गडचिरोली
३.	१०	डॉ. भांदुर्गे महेश श्रीनिवास	पुणे	पविअ, पवैद, श्रे.१ नेसरे, ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर
४.	१२	डॉ. डुकरे सागर पोपट	नागपूर	पविअ (विस्तार), पंचायत समिती चामोर्शी, जि. गडचिरोली
५.	१४	डॉ. गुप्ता हिनल कमलेशभाई	कोकण-१	पविअ, तालपसचि डहाणू, ता. डहाणू जि. पालघर
६.	१६	डॉ. गव्हाणे ज्ञानेश्वर शिवाजी	नागपूर	पविअ (विस्तार) पंचायत समिती, एटापल्ली, जि. गडचिरोली
७.	१८	डॉ. इंगळेपाटील प्रतिक नारायणराव	नागपूर	प्रक्षेत्र व्यवस्थापक, वळूमाता प्रक्षेत्र वडसा, जि. गडचिरोली
८.	१९	डॉ. पालवे गणेश अमृतराव	नाशिक -१	पविअ, तालपसचि अक्कलकुवा ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार
९.	२१	डॉ. पठाण अशफाक चांद	नाशिक -२	पविअ, पवैद, श्रे.१ राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर
१०.	२२	डॉ. नंदेश्वर जिशांत दलितकुमार	नागपूर	पविअ, पवैद श्रे.१ भामरागड ता. भामरागड जि. गडचिरोली
११.	२४	डॉ. भामरे प्रसाद प्रदिप	नागपूर	पविअ (विस्तार) पंचायत समिती, कुरखेडा, ता. कुरखेडा जि. गडचिरोली
१२.	२६	डॉ. गजरे विवेक चंद्रकांत	नागपूर	पविअ, पवैद, श्रेणी-१, एकोडी ता. तिरोडा जि. गोंदिया

अ. क्र.	गु. क्र.	उमेदवारांची नांवे	शासन अधिसूचना दि.२८.०४.२०१५,१६.०७.२०१५ व १५.०६.२०१७ मधील तरतुदीनुसार वाटप केलेला विभाग	पदस्थापनेचे पद
१.	२.	३.	४.	५.
१३.	२९	डॉ. सुरवसे उत्तरेश्वर नारायण	नागपूर	पविअ, पवैद श्रे.१ अहेरी ता. अहेरी जि. गडचिरोली
१४.	३०	डॉ. काळे बाळासाहेब मधुकर	नागपूर	पविअ (विस्तार) पंचायत समिती, धानोरा ता. धानोरा जि. गडचिरोली
१५.	३१	डॉ. कुलकर्णी तृप्ती विनोद	नागपूर	पविअ (विस्तार) पंचायत समिती, राजूरा, ता राजूरा जि. चंद्रपूर
१६.	३४	डॉ. पावडे पवन अरविंद	नागपूर	पविअ (विस्तार) पंचायत समिती, अहेरी, ता अहेरी जि. गडचिरोली
१७.	३६	डॉ. पाटील दिक्षा दिलीप	नागपूर	पविअ, पवैद श्रेणी-१, चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर
१८.	४०	डॉ. मोरे दिक्षाली मधुकर	नागपूर	पविअ (तांत्रिक) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
१९.	४८	डॉ. घोडे विकास सावकार	नागपूर	पविअ (विस्तार) पंचायत समिती, सिरोंचा, ता. सिरोंचा जि. गडचिरोली
२०.	६७	डॉ. माळी हेमाली विजय	नागपूर	पविअ, पवैद, श्रेणी-१, वणी ता.जिवती जि.चंद्रपूर
२१.	६८	डॉ. वावळ निलम पांडुरंग	नागपूर	पविअ (विस्तार) पंचायत समिती, गोंदिया जि. गोंदिया
२२.	६९	डॉ. चराटे विविधा बाबुराव	नागपूर	पविअ, पवैद, श्रेणी-१, कारंजा ता. जि.गोंदिया

वरील उमेदवाराची पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट-अ मधील नियुक्ती ही २ वर्षाचा परिविक्षाधीन काळ समाधानकारकरीत्या पूर्ण करण्याच्या व खालील विहीत अटी व शर्तीच्या अधीन असेल:-

१. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांच्या अधीनतेने त्यांची ज्येष्ठता राहील.

२. या शासन आदेशाद्वारे उक्त २२ उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमित होत असले तरी संदर्भाधीन अ.क्र. ५ येथील महाराष्ट्र लोकसेवा आयोग पत्र क्र. १९४ (१)(२)(४७) /२६१९/ पंधरा-अ, दि.१० मे,२०१९ यांच्या पत्रामध्ये सुचिबध्द केलेल्या गुणानुक्रमानुसार अधिकाऱ्यांची सेवा जेष्ठता ठेवण्यात येईल.

३. वरील उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या पदावर नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या आत रुजू व्हावयाचे आहे. काही अपरिहार्य कारणास्तव त्यांना रुजू होण्यास मुदतवाढ हवी असल्यास तशी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. अन्यथा, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणानुक्रमानुसार त्यांना ज्येष्ठता मिळणार नाही व ते हजर होतील त्या दिनांकापासून त्याची ज्येष्ठता धरण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी विहीत कालावधीत हजर न झालेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येईल.

४. वरील यादीतील उमेदवाराच्या मागील ०५ वर्षातील वास्तव्य कालावधी संदर्भातील चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-०७ यांचे मार्फत करण्याच्या अटींच्या अधिन राहून त्यांना तात्पुरती पदस्थापना देण्यात येत आहे. अशा उमेदवारांचे संबंधित पोलीस यंत्रणेकडून चारित्र्य पडताळणीबाबतचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर ज्या उमेदवारांबाबतचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी अहवाल असमाधानकारक असतील त्या उमेदवारांच्या नेमणुका ०१ महिन्याची नोटीस देऊन संपुष्टात आणण्यात येतील.

५. वरीलप्रमाणे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांनी सेवाप्रवेश नियमानुसार विभागामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या विभागीय परीक्षा, प्रादेशिक भाषा परीक्षा, संगणक परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी विभागीय लेखा परीक्षा तसेच विभागाअंतर्गत वेळोवेळी विहीत नियमानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या इतर परीक्षा परिविक्षा कालावधीच्या ०२ वर्षाच्या विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. परिविक्षाधीन अधिकाऱ्यांने कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहीत विभागीय लेखा परीक्षा परिविक्षा कालावधीत उत्तीर्ण न केल्यास अथवा त्याची वर्तणुक अयोग्य, संशयास्पद आढळल्यास तो /ती कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्यास पात्र ठरेल.

७. उपरोक्त नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार त्यांच्या सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असतील त्यांनी शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एनआरव्ही १०७७/१२ दि.२०.५.१९७७ मधील तरतूदीनुसार शासनाला किमान ०१ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस देणे आवश्यक राहील. शासनास या उमेदवारांची सेवा समाप्त करावयाची असेल त्यावेळी अशी एक महिन्याची आगाऊ नोटीस दिली जाईल. मात्र गैरशिस्त, सेवानियमाचा भंग इ. कारणासाठी सेवा समाप्त करतांना वरील उमेदवारांला नोटीस देण्याचे शासनास बंधन राहणार नाही. हे नोटीशीचे नियम या नंतर वेळोवेळी होणाऱ्या नियमांतील बदलाच्या अधिन राहतील.

८. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ मधील तरतूदीनुसार दि.०१ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर ज्या अधिकारी/कर्मचारी यांची शासकीय सेवेत नियुक्ती होते त्यांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरणार नाही. मात्र उपरोक्त उमेदवारांपैकी जे शासकीय कर्मचारी ०१ नोव्हेंबर, २००५ पुर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह

आस्थापनेवर कार्यरत असतील त्यांना शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अनियो-१००६/ ८७/ सेवा-४, दि. १२.१.२००७ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहतील.

९. सा.प्र.वि. अधिसूचना दि.२८.०४.२०१५ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार सरळसेवेने नियुक्तीसाठी महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर विभागीय संवर्ग्व विभागीय संवर्ग वाटप झालेल्या विभागीय संवर्ग वाटप नियमावली तयार करण्यात आली असून त्यानुसार उपरोक्त उमेदवारांना विभागीय संवर्ग वाटप करण्यात आले आहेत. सदर अधिसूचनेतील तरतुदीनुसार गट-अ संवर्गात नियुक्त झालेल्या उमेदवारांना वाटप झालेल्या विभागीय संवर्गात किमान सहा वर्षे इतका कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यानुषंगाने उपरोक्त उमेदवारांना वाटप करण्यात आलेल्या महसूली विभागीय संवर्गात सहा वर्षे सेवा करणे आवश्यक राहील.

१०. पशुधन विकास अधिकारी, गट-अ या संवर्गात शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार शासन सेवेत आहेत अशा उमेदवारांचे गोपनीय अभिलेख नियुक्ती पूर्वी तपासण्याबाबत आयोगाने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे गोपनिय अहवाल १ महिन्याच्या आत आयुक्त, पशुसंवर्धन यांचेकडे जमा करावे. अशा उमेदवारांना सदर गोपनीय अहवालाच्या तपासणीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

११. वरील सर्व उमेदवारांच्या खालील मूळ प्रमाणपत्रांची तपासणी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तपासणी करावी व सदर कागदपत्रे संपूर्णपणे समाधानकारक असल्याची खातरजमा झाल्यानंतरच संबंधित उमेदवारांना हजर करुन घेण्याबाबतचे निर्देश संबंधित कार्यालय प्रमुखांना देण्यात यावेत व त्यानंतरच संबंधित कार्यालय प्रमुखांनी उमेदवारांना रुजू करुन घ्यावे. त्यासाठी संबंधित सर्व उमेदवारांनी त्यांच्याकडील मूळ प्रमाणपत्रांसह आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-७ या कार्यालयाशी संपर्क साधावा.

१. जात वैधता प्रमाणपत्र.
२. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास)
३. वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र.
४. शाळा सोडल्याचा दाखला.
५. एस.एस.सी.प्रमाणपत्र.
६. एच.एच.सी.प्रमाणपत्र.
७. बी.व्ही.एससी प्रमाणपत्र/एमव्हीएससी प्रमाणपत्र.

१२. ज्या उमेदवारांना रंगदृष्टीदोष (Colour Blindness) आढळून आला असेल, अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे रंगदृष्टीदोषाबाबत पुन्हा तपासणी करुन घेऊन हे उमेदवार पशुधन विकास अधिकारी, गट-अ या पदावर कामकरण्यास वैद्यकीयदृष्टया पात्र होतो किंवा कसे याची खात्री करण्यात यावी. तसेच अशा उमेदवारांनाच्याबाबत अंतिम वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्या शिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येऊ नये.

१३. वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इतर मागासवर्ग तसेच अमागास (महिला) या वर्गवारीवर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे प्रमाणित केलेली उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची विहित नमुन्यातील दिनांक १ एप्रिल, २०१२ किंवा तद्नंतरच्या दिनांकाचे प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा.पुणे यांचेकडे तपासणीसाठी सादर करावी. सदरची प्रमाणपत्रे विहीत प्राधिकरणाकडून तपासण्याची कार्यवाही आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा.पुणे यांनी करावी व तपासणीचा अहवाल शासनास सादर करावा.

१४. वरीलपैकी जे उमेदवार विहित मुदतीत सेवेत हजर होतील त्यांचे बाबतचा रुजू अहवाल आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-७ यांनी शासनास तात्काळ सादर करावा.

१५. वरील उमेदवार ज्या दिनांकास रुजू होतील त्या दिनांकापासून नियमाप्रमाणे त्यांचे गोपनीय अहवाल लिहीण्यात येतील व बदली झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावेत.

१६. वरील नियुक्त्या ह्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेल्या जाहीरात क्र.२४/२०१७ बाबत विविध न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उमेदवारांची नियुक्ती सुरु ठेवणे अथवा गुणवत्ता क्रमांकामध्ये बदल होण्याच्या अधीन सदर नियुक्त्या करण्यात येत आहेत.

१७. सदर उमेदवारांना पदस्थापना ह्या त्यांच्या पोलिस तपासणी अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांनी त्यासंदर्भातचे हमीपत्र आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे तातडीने सादर करावे. उपरोक्त उमेदवारांनी सदर हमीपत्र सादर केल्यानंतरच आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उमेदवारांना संबंधित पदस्थापनेच्या पदावर रुजू करुन घ्यावे.

१८. उपरोक्त नमूद अटी व शर्तींचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी आयुक्त,पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. तसेच उपरोक्त परिविक्षाधीन अधिका-यांना सदर संवर्गाचे परीक्षा नियम,सेवा प्रवेश नियम तसेच इतर सर्व महत्वाचे सेवाविषयक नियम त्यांना ज्ञात करुन देण्याची कार्यवाही आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०८२९१५५१३३७५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Digitally signed by Dilipkumar Shedmekhe
Date: 2019.08.29 15:59:40 +05'30'

(दि. ज. शेडमेखे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,

३) मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
४) मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्रासह)
५) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे.
७) सर्व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त.
८) सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, पुणे.
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
१०) सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
११) सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालये
१३) सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका पशुवैद्यकीय लघु सर्वचिकीत्सालये
१४) सर्व पशुधन विकास अधिकारी,जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र
१५) महालेखापाल/महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा)मुंबई/ नागपूर
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७) संबेधित अधिकारी मार्फत आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे -६७
१८) निवड नस्ती (पदुम-१).